# बृहन्मुंबई महानगरपालिका- शिक्षण विभाग

शिक्षणाधिकारी यांचे कार्यालय, त्रिवेणी संगम म.न.पा. शालेय इमारत, महादेव पालव मार्ग, करी रोड(पूर्व), मुंबई-400 012.

क्र. आयईओ/ओडी/699
दिनांक :14.03.2020

प्रति,
सर्व मुख्याध्यापक
(मनपा व खाजगी प्राथ. अनुदानित व विना अनुदानित शाळा)

विषय : राज्यत करोना विषाणू (कोव्हिड19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत.

संदर्भ : 1. सार्वजनिक आरोगय विभाग, नविन मंत्रालय यांचे क्र. करोना2020/प्र. क्र.58/आरोगय 5 दि. 14 मार्च 2020 अन्वये प्राप्त आदेश.

2. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय, यांचे संकीर्ण-2020/प्र.क्र.101/एसडी - 4. दि. 14.03.2020 अन्वये प्राप्त आदेश.

मान. प्रधान सचिव , महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोगय विभाग, नविन मंत्रालय यांचे क्र. करोना2020/प्र. क्र.58/आरोगय 5 दि. 14 मार्च 2020 अन्वये राज्यत करोना विषाणू (कोव्हिड19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत आदेश प्राप्त झाले आहेत.

त्याअनुषंगाने उपरोक्त संदर्भ क्र. 2 अन्वये मान. उप सचिव, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय, यांच्याकडून ही विषयांकीत आदेश प्राप्त झाले आहेत. सदर आदेशात दि. 31 मार्च 2020 शाळा बंद पर्यंत सर्व शाळा बंद ठेवण्याबाबत सुचित करण्यात आले आहे. तथापि, इ. 10 वी व इ. 12 वी च्या विहित परिपत्रकानुसार परिक्षा घेण्यातबाब ची सुचना केली आहे. उपरोक्त आदेशाचे पालन करण्यात यावे व दि. 31 मार्च 2020 पर्यंत सर्व शाळा बंद ठेवण्यात याव्यात.

तथापि, महानगरपालिका क्षेत्रातील इ. 10 वी व इ. 12 वी च्या परिक्षा सुरळीत होईल याची दक्षता घेण्यात यावी.

त्याचप्रमाणे आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यींच्या संपर्कात येणार नाही. यासाठी ही आवश्यक ती दक्षता व खबरदारी घेण्यात यावी.

उपरोक्त निर्देशाचे पालन करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल निम्न स्वाक्षरीकारास सादर करावा.

MMPalkar
(श्री. महेश पालकर.)
शिक्षणाधिकारी
बृहन्मुंबई महानगरपालिका

Scanned by CamScanner

**महाराष्ट्र शासन**

E-mail id : sd4.sesd-mh@gov.in
अत्यंत तातडीचे

क्रमांक: संकीर्ण-२०२०/प्र.क्र.१०१/एसडी-४.
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: १४ मार्च,२०२०.

प्रति,

१) शिक्षण संचालक (प्राथमिक)/ (माध्यमिक व उच्च माध्यमिक),
महाराष्ट्र राज्य, पुणे
२) संचालक (अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण),पुणे
३) विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)
४) सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक,माध्यमिक व उच्च माध्यमिक)

**विषय :** राज्यात करोना व्हायरस चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी खबरदारी म्हणून राज्यातील सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व सर्व नगर पंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी व खाजगी शाळा / कनिष्ठ महाविद्यालये यांना दिनांक ३१ मार्च,२०२० पर्यंत सुटी जाहीर करणेबाबत.

वरील विषयाबाबत प्रधान सचिव,सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे क्र.करोना-२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५,दिनांक १४ मार्च,२०२० च्या यासोबत जोडलेल्या पत्राचे कृपया अवलोकन करावे. सदर पत्रानुसार पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत -

करोना विषाणूचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व सर्व नगर पंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी व खाजगी शाळा तसेच महाविद्यालये व आयुक्त, व्यवसाय व प्रशिक्षण केन्द्रे यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, 1897 अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावली मधील तरतदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने दिनांक 31 मार्च 2020 पर्यंत बंद ठेवण्याबाबत याद्वारे सूचित करण्यात येत आहे.

तथापि या सर्व महानगरपालिका, नगरपालिका व नगर पंचायत क्षेत्रातील इयत्ता 10 वी व 12 वी च्या परिक्षा विहीत वेळापत्रकानुसार घेण्यात याव्यात.

त्याचप्रमाणे आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाही यासाठी आवश्यक ती दक्षता व खबरदारी घेण्याच्या सूचना संबंधीत संस्था प्रमुखास देण्यात येत आहेत.

तरी उपरोक्त नुसार दिनांक ३१ मार्च,२०२० पर्यंत शाळा/कनिष्ठ महाविद्यालये बंद ठेवण्याबाबत व इयत्ता 10 वी व 12 वी च्या परिक्षा विहीत वेळापत्रकानुसार घेण्यात याव्यात या सूचना आपल्या अधिपत्याखालील शाळांच्या निदर्शनास आणण्यात याव्यात व त्याबाबतचा अनुपालन अहवाल शासनास सादर करावा.

(राजेंद्र पवार)
उप सचिव,महाराष्ट्र शासन

सोबत : वरीलप्रमाणे.

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित:-

१) आयुक्त (शिक्षण),महाराष्ट्र राज्य, पुणे
२) अध्यक्ष,राज्य मंडळ,पुणे
३) अध्यक्ष,महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे
४) महासंचालक,माहिती व जनसंपर्क कार्यालय,मंत्रालय,मुंबई.

Scanned by CamScanner

महाराष्ट्र शासन

अत्यंत तातडीचे

क्रमांक करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य ५
सार्वजनिक आरोग्य विभाग
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार
कॉप्लेक्स बिल्डिंग, नविन मंत्रालय,
मुंबई-४०० ००१
दिनांक- १४ मार्च २०२०

प्रति,

अपर मुख्य सचिव
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

सचिव, उच्च व तंत्रशिक्षण
मंत्रालय, मुंबई

आयुक्त, व्यवसाय व प्रशिक्षण, पुणे
संचालक, शालेय शिक्षण, पुणे / उच्च व तंत्रशिक्षण, मुंबई

विषयः राज्यात करोना विषाणू (कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत..

शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावलीही तयार करण्यात आली असून स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येत आहे.

करोना विषाणुचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व सर्व नगर पंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी व खाजगी शाळा तसेच महाविद्यालये व आयुक्त, व्यवसाय व प्रशिक्षण केंद्रे यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावली मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने दिनांक ३१ मार्च २०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत याद्वारे सूचित करण्यात येत आहे.

तथापि, या सर्व महानगरपालिका, नगरपालिका व नगर पंचायत क्षेत्रातील १० व १२ च्या परिक्षा तसेच विश्वविद्यालयाच्या परिक्षा विहीत वेळापत्रकांनुसार घेण्यात याव्या असाही निर्णय घेण्यात आला आहे.

त्याचप्रमाणे आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाही यासाठी आवश्यक ती दक्षता व खबरदारी घेण्याच्या सूचना संबंधीत संस्था प्रमुखास देण्यात याव्यात.

तरी उपरोक्तनुसार तात्काळ कार्यवाही करण्याबाबत आपल्या अधिपत्याखालील सर्व आस्थापनांना सूचित करण्यात यावे त्याबाबतचा अनुपालन अहवाल शासनास सादर करावा.

(डॉ. प्रदीप व्यास)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत विभागीय आयुक्त, (सर्व)
प्रत प्रधान सचिव (नगरविकास - २) मंत्रालय, मुंबई
प्रत आयुक्त, महानगरपालिका, (सर्व)

Scanned with CamScanner

Scanned by CamScanner

प्रत जिल्हाधिकारी, (सर्व).
प्रत आयुक्त, आरोग्य सेवा, मुंबई
प्रत संचालक, आरोग्य सेवा मुंबई / पुणे
प्रत संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
प्रत मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
प्रत मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
प्रत मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव

Scanned with CamScanner
Scanned by CamScanner